MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



धुनकवाड येथे सुरू असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या वर्ग खोल्यांचे व बोगस दर्जाचे होत असलेले बांधकाम तात्काळ थांबविण्यात यावे व अंदाजपत्रकानुसार काम करण्यात यावे या मागणीसाठी धारुर येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण चालु आहे.यावेळी ग्रामपंचायत सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य,पालक,व समस्त गावकरी उपस्थित आहेत.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –३४ | सोमवार दि.२१ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -34 | MONDAY DT.21 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जात असताना तडजोडीचा राजकारण करत माजी मंत्री सुरेश नवलेनी एकनाथ शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला होता?
- माजी मंत्री सुरेश नवले हे विधान परिषदेवर दहा वर्षे आमदार होते काय दिवे लावले हे जनतेला सागावं ? माजी मंत्री सुरेश नवले नी विधानपरिषदेचा फंड कोणत्या कार्यकर्त्यांना दिला व बीड शहरात कुठे काम केली हेही सागावं?
- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आ. सदीपक्षिरसागर अनिल जगताप आ. सुनील धांडे कुंडलिक खांडे राजेंद्र मस्के यांच्या विरोधातच बोलण्यात सुरेश नवले यांचा आयुष्य गेलं?
- माजी मंत्री सुरेश नवलेना जयदत्त क्षीरसागर संदीप क्षीरसागर मा. आ. सुनील धांडे योगेश क्षीरसागर अनिल जगताप कुंडलिक खांडे राजेंद्र मस्के अशोक हिंगे बाजीराव



## बीड विधानसभेत सुरेश नवलेच्या नावाला अनेक मराठा समाजाच्या नेतेमंडळींचा विरोधच?

अनिल जगताप स्वप्रिल गलधर कुंडलिक खांडे राजेंद्र मस्के बीबी जाधव परमेश्वर सातपुते बाजीराव चव्हाण मराठा समाजातील लोकांसाठी झटणारे व संघटनात्मक बांधणी करून 24 तास रस्त्यावर उतरणारे वरील मंडळी माजी मंत्री सुरेश नवलेंपेक्षा भारीच?

बीड विधानसभेत सुरेश नवलेच्या नावाला अनेक मराठा समाजाच्या नेतेमंडळींचा विरोधच?

# शिंदे गटाच्या शिवसेनेच जिल्हाप्रमुखपद स्वत:च्या भावाला न केल्यामुळं शिंदेच्या शिवसेनेतून माजी मंत्री सुरेश नवले बाहेर पडले ?

बीड शहराच्या व बीड जिल्ह्याच्या विकासासाठी माजी मंत्री सुरेश नवले यांनी गेल्या पंचवीस तीस वर्षांमध्ये काय केले आहे साधं एक वाळूचे टोपले टाकू शकले नाहीत आणि निघाले पुन्हा बीड विधानसभेमधून आमदार व्हायला मनोज जरांगे पाटलांच्या आदेशामुळे मराठा समाजाचा ज्या त्या उमेदवाराला मतदान करणार आहे. परंतु माजी मंत्री सुरेश नवले जर उभा राहिले तर नक्कीच त्या ठिकाणी मराठा समाजाचा मतदार सुद्धा सुरेश नवलेना करणार नाही असं चित्र आता बीड शहरांमध्ये पाहायला मिळत आहे.!



बीड शहरातून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी एक विकासाच्या हेतूने आणलेला मोठा मोठा निर्णय म्हणजे बीड शहरामधून उड्डाणपूल होणार होता. परंतु माजी मंत्री सुरेश नवले यांनी त्या उडानपूलांमध्ये खोडा घातला व क्षीरसागर यांना विरोध म्हणून फक्त बीड शहरांमध्ये उड्डाणपूल फक्त माजी मंत्री सुरेश नवलेनी होऊन दिला नाही. अशीही चर्चा सध्या बीडच्या नागरिकांना उभा राहिले तर आम्ही त्यांना मतदान करणार नाहीत असेही यावेळी बीड शहरातील नागरिक म्हणत आहेत.

मराठा समाजाच्या लोकांमध्ये आता जागृत्ता झाली आहे मनोज दादा जरागे पाटील सांगतील ते धोरण आणि तेच तोरण असेल यावेळी मनोज दादा जरागे पाटील यांनी उमेदवार लढवायचे म्हणून आदेश काढल्यानंतर मराठा समाज एकवटला आहे सर्वसामान्य कुटुंबातील लोक आता मनोज दादा जरांगे पाटील यांच्या सांगण्यावरूनच उमेदवारांना मतदान करतील परंतु त्या ठिकाणी आता माजी मंत्री सुरेश नवले यांना आमदारकी स्वप्न पडू लागले आहेत परंतु ते स्वप्न फक्त आता स्वप्नच राहणार आहेत.!

तीन वर्षांत एकनाथ शिदे च्या शिवसेनेच काम केल व फक्त तिथून स्वताच्या भावाची म्हणजे चंद्रकांत नवले ची गुत्तेदारी चालवली आणि चंद्रकांत नवलेला एकनाथ शिंदे गटाचं जिल्हाप्रमुख पद न मिळाल्यामुळे त्यांनी फक्त एकनाथ शिंदे यांची शिवसेना सोडल्याची चर्चा बीड शहरातील राजकीय





बीड : प्रतिनिधी - बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये विजलेला दिवा म्हणून माजी मंत्री सुरेश नवले यांच्याकडे पाहिले जात. विधान परिषदेची आमदारकी मिळवली नंतर काँग्रेसमध्ये नारायण राणे यांच्यासोबत फाटल्याच्या नंतर त्यांनी वेगवेगळ्या पक्षांमध्ये जाऊन स्वतःची राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न केला आहे माजी मंत्री सुरेश नवले हे एकमेव असे माजी मंत्री आहेत कि बीड चे गेल्या वीस पंचवीस वर्षांपासून भावी आमदार म्हणून मी मिरवत आहेत त्यांच्या भावी आमदाराला सदैव बीड जिल्ह्याची जनता फक्त शुभेच्छा देते परंतुमाजी मंत्री सुरेश नवलेना मतदान कधीच देत नाहीत माजी मंत्री सुरेश नवले आता सर्वसामान्य खेड्यापाड्यातील 18 पगड जातीचा दलित मुस्लिमांचा कार्यकर्ता कोण आहे हे स्पष्ट करा व प्रत्येक गावामध्ये बूथनिहाय बूथ प्रमुख आहेत. का प्रत्येक मतदानाच्या बुथवर बसायला लोक माजी मंत्री सुरेश नवलेना मिळतील का माजी मंत्री सुरेश नवले एसी गाडीमधून सुभाष रोडवरील निवासस्थानावर निघायचं आणि नगर रोडवरील ऑफिसमध्ये जाऊन बसायचं व त्या ठिकाणी बोल बच्चन करून विरोधकांवर टीका करायचं जे लोक काम करत आहेत त्यांनाही काम करून द्यायचं नाही व बीड शहरामध्ये वेगवेगळ्या योजनेत असताना सुरेश नवले नि आज पर्यंत किती पत्र व्यवस्थेला गेल्या वीस पंचवीस वर्षातील सर्व पत्र व्यवहारात गणित हे जनतेसमोर मांडायला हरकत नाही म्हणून सुरेश नवले हे वेगवेगळ्या प्रमाणे फडफड करत आहेत अशी चर्चा बीड मतदार संघामधील लोकांमध्ये होत आहे.

# गवत आणण्यासाठी गेलेल्या महिलेवर दोघांकडून अत्याचार

## गेवराई पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल



प्रतिनिधी । गेवराई

गेवराई : जनावरांना चारा आणण्यासाठी गेलेल्या महिलेवर दोघांनी अत्याचार करून पीडित महिला व तिच्या सासूला मारहाण केली ही घटना गुरुवारी (दि. १७) गेवराई तालुक्यात उघडकीस आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार खामगाव (ता. गेवराई) येथील २१ वर्षीय महिला गुरुवारी (दि. १७) सकाळी सहा वाजता राम गिते यांच्या शेतातील बांधावर जनावरांना गवत आणण्यासाठी गेली होती. या ठिकाणी जनार्धन गिते व गोवर्धन गिते हे दोघे उसाची भिजवणी करीत होते. त्यातील एकाने या महिलेशी लगट करुन तुझे लग्न झाले का ? मला तु खुप आवडते, असे म्हणत असताना पाठीमागून दुस-याने तिचे डोळे बांधले. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केला. या घटनेनंतर पीडितेने सर्व प्रकार घरातील कुटुंबीयांना सांगितला. त्यानंतर संशयितांनी महिला आणि तिच्या सासूला मारहाण केली.

गेवराई पोलीस ठाण्यात आरोपी जनार्धन गिते, गोवर्धन गिते आणि राम गिते (रा. खामगाव, ता. गेवराई, जि.बीड) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास गेवराईचे पोलिस उपविभागीय अधिकारी निरज राजगुरू करीत आहेत.

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

# बालविवाह म्हणजे मुलांच्या हक्कांचे उल्लंघन, कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जारी केली मार्गदर्शक तत्त्वे

**प्रतिनिधी** । किल्ले धारूर

स्वतःच्या इच्छेने जीवनसाथी निवडण्याच्या अधिकाराचे उल्लंघन करते.हा निर्णय एनजीओ 'सेवा' आणि कार्यकर्ते निर्मल गोराणा यांच्या याचिकेवर आला, दोन्ही सदस्य आणि 'बालविवाह मुक्त भारत' मोहिमेचे सहकारी.युवा ग्राम विकास मंडळ यांनी कृतज्ञता व्यक्त केली आणि सांगितले की, या निर्णयामुळे २०३० पर्यंत देशातून बालविवाहाचे उच्चाटन होईल.

बालविवाह मुक्त भारत ही २०० हून अधिक स्वयंसेवी संस्थांची युती आहे जी एकट्या २०२३-२४ मध्ये देशभरात १२०,००० बालविवाह थांबवेल आणि ५०,००० बालविवाहमुक्त गावे तयार केली. देशातील बालविवाह कायद्यावर ऐतिहासिक निर्णय देताना, सर्वोच्च न्यायालयाने कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे जारी केली, असे म्हटले आहे की बालविवाहामुळे स्वत:च्या इच्छेनुसार जीवनसाथी निवडण्याचा अधिकार काढून घेतला जातो. सोसायटी फॉर एनलाइटनमेंट अँड व्हॉलंटरी क्शन (डएथ-) आणि 'बालविवाह मुक्त भारत' मोहिमेचे भागीदार कार्यकर्ते निर्मल गोराणी यांच्या याचिकेवर आलेल्या या निर्णयाचे स्वागत करताना, छत्रञ्ज्युवा ग्राम विकास मंडळ म्हणाले, हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे देशातील बालविवाह संपुष्टात आणण्याच्या प्रयत्नांना बळ मिळेल आणि आम्ही राज्य सरकारला या मार्गदर्शक तत्त्वांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आवाहन करतो जेणेकरून २०३० पर्यंत भारत बालविवाहमुक्त करण्याचे उद्दिष्ट साध्य करता येईल. युवा ग्राम विकास मंडळ 'बालविवाह मुक्त भारत' (उचत्रख) मोहिमेचा एक प्रमुख भागीदार आहे, देशभरातील २०० हून अधिक स्वयंसेवी संस्थांची युती आहे जी २०३० पर्यंत बालविवाह समाप्त करण्यासाठी ४०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये तळागाळात मोहीम राबवत आहे. आहेत.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती डी.वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने निकाल देताना म्हटले आहे की, बालविवाह प्रतिबंध कायदा , २००६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकार आणि प्रशासनाने प्रतिबंध-प्रतिबंध-अभ्यासाची रणनीती असलेल्या समुदाय-आधारित दृष्टिकोनाने काम करणे आवश्यक आहे. . सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये शाळा, धार्मिक संस्था आणि पंचायतींना बालविवाहाचे उच्च प्रमाण असलेल्या भागात बालविवाह रोखण्यासाठीच्या उपाययोजनांची माहिती शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, यासाठी शाळा, धार्मिक संस्था आणि पंचायतींना महत्त्वाचे साधन म्हटले आहे. बालविवाहाविरुद्ध जनजागृती करणे. विभागीय



खंडपीठासमोर स्वयंसेवी संस्था सेवा आणि कार्यकर्ते निर्मल गोराणा यांच्या याचिकेवर सुनावणी सुरू होती, ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की, देशातील बालविवाहाची परिस्थिती गंभीर आहे आणि बालविवाहविरोधी कायद्याच्या मूळ भावनेशी खेळले जात आहे. आणि आत्मा असायचा.

निकाल देताना न्यायमूर्ती डी.वाय. संरक्षण-संरक्षण-अभियोग धोरण आणि समुदाय-आधारित दृष्टिकोन यावर जोर देऊन चंद्रचूड म्हणाले, कायदा तेव्हाच यशस्वी होऊ शकतो जेव्हा बहु-क्षेत्रीय समन्वय असेल. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आणि क्षमता वाढण्याची गरज आहे. आम्ही पुन्हा एकदा समुदाय-आधारित दृष्टिकोनाच्या गरजेवर जोर देतो.

या निर्णयाचे स्वागत करताना युवा ग्राम विकास मंडळाचे कार्यकारी सचिव एच पी म्हणाले, हा आपल्या सर्वांसाठी अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे. बालविवाह रोखण्यासाठी राज्य सरकार आणि स्थानिक प्रशासन ज्या आवेशाने आणि जिद्दीने काम करत आहे ते कौतुकास्पद आहे आणि हा निर्णय आपल्या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांना अधिक बळ देईल. बालविवाह हा एक गुन्हा आहे ज्याने संपूर्ण देशाला वेठीस धरले आहे आणि त्याच्या स्पष्ट व्याख्याबद्दल आम्ही सर्वोच्च न्यायालयाचे आभारी आहोत. आम्हाला विश्वास आहे की एकत्रितपणे आणि एकत्रित प्रयत्नांनी आम्ही २०३० पर्यंत हा गुन्हा पूर्णपणे नष्ट करू. आम्ही तुम्हाला सांगतो की, बालविवाह मुक्त भारत अभियान आणि त्याच्या भागीदार स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांमुळे गेल्या एका वर्षात देशात १२०,००० बालविवाह यशस्वीपणे थांबवण्यात आले. याव्यतिरिक्त, सरकारी प्रयत्नांमुळे बालविवाहास बळी पडलेल्या १.१ दशलक्ष मुलांचे लग्न होण्यापासून रोखले गेले.

'बालविवाह मुक्त भारत' मोहिमेचे संस्थापक भुवन रिभू यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे वर्णन भारत आणि संपूर्ण जगासाठी एक उदाहरण म्हणून केले आणि ते म्हणाले, हा ऐतिहासिक निर्णय संस्थात्मक संकल्पना मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण वळण देणारा ठरेल. देशातून बालविवाह समूळ निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हा अतिशय महत्त्वाचा विजय आहे. सुप्रीम कोर्ट आणि सरकारच्या प्रयत्नांनी हे दिसून आले आहे की त्यांना मुलांची काळजी आहे आणि आता वेळ आली आहे की आपण सर्वांनी पुढे येऊन या सामाजिक गुन्ह्याला संपवण्याची गरज आहे.

रिभू म्हणाले, जर आपण आपल्या मुलांचे संरक्षण करण्यात अयशस्वी झालो तर जीवनात दुसरे काहीही महत्त्वाचे नाही. सुप्रीम कोर्टाने पुन्हा एकदा सर्वांगीण दृष्टिकोनाची गरज अधोरेखित केली आहे आणि 'बालविवाह मुक्त भारत अभियान' देखील 'पिकेट' रणनीतीद्वारे यावर जोर देत आहे. बालविवाह त्याच्या मूळ स्वरुपात लहान मुलांवर होणारा बलात्कार आहे. हा निर्णय केवळ आमचा निश्चयच मजबूत करत नाही तर उत्तरदायित्व आणि सहयोगी प्रयत्नांद्वारे आम्ही बालविवाह संपुष्टात आणू शकतो, जो मुलांवरील हिंसाचाराचा सर्वात घृणास्पद प्रकार आहे हे देखील अधोरेखित करतो.

'बालविवाह मुक्त भारत' ही मोहीम २०३० पर्यंत बालविवाह बंद करण्यासाठी देशभरात कार्यरत असलेल्या २०० हून अधिक स्वयंसेवी संस्थांची युती आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, या सर्व भागीदार संस्था एक सर्वांगीण धोरण 'पिकेट' राबवत आहेत ज्यात धोरण, संस्था, अभिसरण, ज्ञान, पर्यावरण, तंत्रज्ञान यासारख्या गोष्टींचा समावेश आहे. धार्मिक नेते आणि समुदाय यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे, ४.९० कोटी लोकांनी बालविवाहाच्या विरोधात शपथ घेतली आहे

# वंचित बहुजन आघाडी बीड विधानसभेसाठी मुस्लिम चेहरा देण्याची शक्यता

**प्रतिनिधी** । बीड

२०२४ महाराष्ट्र विधानसभा सध्या रंगात येऊन ताप लेल्या अवस्थेत आला आहे महायुती महाआघाडी दोन्ही गट नवीन चेहरे, जुने चेहरे , जाती समीकरण बघून उमेदवारी देण्याचे प्रक्रिया चालू आहे याच प्रक्रियेत वंचित बहुजन आघाडी आपली तिसरा गट निर्माण करून सर्व समाजाच्या धर्माच्या लोकांना सोबत घेऊन महाराष्ट्र जिंकण्याच्या तयारीत दिसत आहे याच पार्श्वभूमीवर २०२४ विधानसभा साठी यादी जाहीर करतात व हे बघूनच वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या जाती धर्मांच्या लोकांना संधी देण्याचे पुढाकार घेत आहे. बीड विधानसभा मध्ये मुस्लिम समाज हा निर्णयाक असल्यामुळे मुस्लिम चेहराला संधी देण्याचे पुढाकार घेत आहे महायुतीमध्ये सरळपणे हिंदुत्व पुढे करून मुस्लिम समाजाला डवलतान समोर दिसते तर मुस्लिम समाजाचा मतांचा उपयोग करून घेत त्यांना संधी देण्याचा विसर होत आहे याच पार्श्वभूमीवर सर्व बहुजन व मागास जाती धर्मांच्या लोकांना पुढे करण्याचे काम वंचित बहुजन आघाडी करत आहे यामुळेच बीड शहरातील सिद्दिकी सर यांचा नाव वंचित बहुजन



आघाडी पक्षात चर्चेत येत आहे सिद्दिकी

सर हे एक चांगले खेळाडू वृत्तीचे मनमिळाव राज्य व केंद्र स्तरावर राजकारणावर नजर ठेवून लोकांशी संवाद साधताना शब्दांचा योग्य उपयोग करत असल्यामुळे वंचित बहुजन आघाडी यांना संधी देण्याची शक्यतेचा भास होत आहे कदापि हा चेहरा समोर केल्यास बीड विधानसभा मध्ये होत असलेल्या चौरंगी लढती मध्ये पाचवा उपयोगी चेहरा समोर येण्याची शक्यता आहे हा चेहरा सर्व समाजामध्ये गोरगरीब श्रीमंत सुशिक्षित खेळाडू वृत्ती मध्ये चर्चा निर्माण करणारा आहे

# भाजपाच्या पहिल्याच यादीत आ. नमिता मुंदडा

**प्रतिनिधी** । केज

राज्याच्या राजकारणात उमेदवारीवरून घमासान सुरू असताना, अनेकांना अस्थिर वाटत असताना भाजपाच्या पहिल्याच यादीत केजच्या आ. नमिता मुंदडा यांना स्थान मिळाले असून बीड जिल्ह्यातील पहिली उमेदवारी भाजपाने केज मतदार संघातून नमिता मुंदडा यांच्या माध्यमातून जाहीर केली आहे.

युती आणि आघाडीच्या राजकारणात इच्छूक अनेक असले तरी विद्यमान आमदारांना सुद्धा उमेदवारी मिळेल की नाही याची शाश्वती वाटत नाही. अशा परिस्थितीत भारतीय जनता पक्षाने आपल्या

## केजमधून उमेदवारी जाहीर



उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीमध्ये बीड जिल्ह्यातून आ. नमिता मुंदडा यांचे नाव असल्यामुळे आमदारकीच्या काळात आ. नमिता मुंदडा यांनी केलेले काम पक्षबळकटीसाठी आणि पक्ष संघटन वाढविण्यासाठी त्यांचे असलेले योगदान याची पावती भाजपाने दिली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. केजमधून आ. नमिता मुंदडा यांचे उमेदवारांच्या पहिल्याच यादीत नाव आल्यामुळे मुंदडा समर्थकांनी मोठा जल्लोष साजरा केला.



# नागवंशी बुध्द विहार वडवणी येथे, धम्मग्रंथ वाचनाचा, समारोप संपन्न

**प्रतिनिधी** । वडवणी

नागवंशी बहुद्देशिय सेवाभावी संस्था यांच्या वतिने डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित,, बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ,, या ग्रंथाचे वाचन ,,वर्षावास,, निमित्त आषाढी पौर्णिमा ते अश्विनी पौर्णिमा या तीन महिन्याच्या कालखंडामध्ये ग्रंथ वाचनाचा कार्यक्रम नियमितपणे तीन महिन्याच्या काळामध्ये सुरू राहिला ..बौद्ध उपासक उपासिका यांनी सदरील ग्रंथ नियमितपणे श्रवण केल्यामुळे,, वडवणी परिसरामध्ये एक धम्ममय वातावरण व चैतन्याचा वातावरण निर्माण करून देण्याचे श्रेय नागवंशी बहुद्देशिय सेवाभावी संस्था व भारतीय बौद्ध महासभेच्या सर्व सदस्यांना दिले जाते. प्रत्येकाने अंधश्रद्धा सोडून बौद्ध धर्माकडे जाण्याचा संकल्प केल्यामुळे ,,येथील समाज जीवनामध्ये खूप मोठे परिवर्तन घडून आले आहे.. त्यामुळे सर्व समाजातील लोकांना विशेष आनंद झालेला आहे.. ग्रंथ वाचन तीन महिन्याच्या कालखंडामध्ये सुरू केल्यानंतर अश्विनी पौर्णिमेच्या निमित्ताने ग्रंथ वाचनाचा समारोप फार मोठ्या उत्साहामध्ये नागवंशी बुध्द विहार या ठिकाणी संपन्न झाला ..या कार्यक्रमाच्या निमित्ताने फार मोठ्या प्रमाणात बौद्ध उपासक उपासिका हजर होत्या.. आनंदमय वातावरणामध्ये सर्व उपासक उपासिका यांनी फार मोठ्या आनंदात साजरा केला. या पवित्र दिनी सर्वांना बाबासाहेब साळवे यांच्या वतीने अन्नदान करण्यात आले.. व आनंदमय वातावरणामध्ये ग्रंथ वाचनाचा समारोप झाला . सर्व उपासक व उपाशिका यांनी मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प केला. सर्व स्तरातून या कार्यक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

# गोरगरिबांना कुटुंबाप्रमाणे जपणाऱ्या बदामराव आबांनी कोणाचे नुकसान केले नाही - युधाजित पंडित

**प्रतिनिधी** । गेवराई

बदामराव पंडित यांनी गेल्या ४० वर्षापासून तालुक्यात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्य करत असताना, गोरगरीब आणि अठरापगड जातीतील लोकांची कामे करून सातत्याने त्यांची सेवा केली आहे. तीन वेळेस आमदार आणि एक वेळेस मंत्री पदावर काम करूनही बदामराव आबा कधी गर्विष्ठपणाने वागले नाही. ४० वर्षात त्यांनी कोणाचेही कोणतेही नुकसान केले नाही. येईल त्याचे प्रामाणिकपणे काम केले म्हणूनच यावेळी गेवराई मतदार संघातील लोकांनी त्यांना विधानसभेत आमदार म्हणून पाठविण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट दिसत असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हा समन्वयक तथा बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजीत पंडित यांनी केले आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारीवर विधानसभा निवडणुकीला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे सामोरे जात आहेत. त्यांच्या विजयासाठी शिवसेना जिल्हा समन्वयक तथा जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित



हे गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. यावेळी मतदारांशी संवाद साधताना युधाजित पंडित म्हणाले की, गेल्या ४० वर्षापासून बदामराव पंडित हे गेवराई विधानसभा मतदारसंघात गोरगरिब आणि सामान्य माणसाचे प्रामाणिकपणे कामे करत आहेत. आबांनी केलेला विकास म्हणजे केवळ रस्ते, शाळा, पाणीपुरवठा योजना, आणि प्रशासकीय इमारती उभा केल्या यातूनच दिसत नाही तर तालुक्यातल्या प्रत्येक गावातल्या माणसाशी कुटुंबाप्रमाणे नाते जपत त्यांचे सुख-दुःख वाटून घेत जपलेल्या आपुलकीच्या नात्यातून दिसते. दवाखान्याचे काम असो किंवा पोलीस स्टेशनचे, घरातील लेकीबाळीचे काम असो की, शेताच्या बांधावरून झालेल्या भांडणाचा वाद असो या प्रत्येक ठिकाणी बदामराव पंडित हे स्वतः उपस्थित राहून त्यातून योग्य मार्ग काढण्याचे काम आजपर्यंत करत आले आहेत. सर्व समाजाला सोबत घेऊन सतत सकारात्मक काम करत असल्याने आज गेवराई विधानसभा मतदारसंघात बदामराव पंडित यांच्यावर प्रेम करणाऱ्या माणसांची संख्या दुप्पट वाढली आहे. केलेल्या कामाबद्दल या विधानसभा निवडणुकीत त्यांना मतदान करून आपले आशीर्वाद द्या आणि विधानसभेत गेवराई मतदार संघाचा आमदार म्हणून काम करण्याची त्यांना संधी द्या असे आवाहन युधाजित पंडित यांनी उपस्थित ग्रामस्थांना केले आहे.

यावेळी त्यांच्या समवेत शिवसेना उपजिल्हाप्रमुख महादेव औटी, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, शिवसेना किसान सेल तालुका अध्यक्ष सतीश सपकाळ, शिवसेना अल्पसंख्यांक सेल तालुकाध्यक्ष तय्यब पठाण, सरपंच भैय्यासाहेब नाईकवाडे, बदाम पौळ यांची उपस्थिती होती. प्रत्येक गावात झालेल्या गाठीभेटीच्या दौऱ्यात ग्रामस्थांसह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज मधुन पप्पु कागदे यांना डावल्यामुळे बीड जिल्ह्यात रि.पा.ई.महायुतीच्या विरोधात काम करणार-मायाताई मिसळे

**प्रतिनिधी** । बीड

रिपाई जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मागे बीड जिल्ह्यातील आंबेडकरी जनता खंबीरपणे उभी आहे यांना महायुतीकडून केज राखीव मतदारसंघात उमेदवारी देण्याचे संकेत दिले होते.२०१९ मध्ये देखील उमेदवारी देण्याचे निश्चित झाले होते,परंतु शेवटच्या क्षणात उमेदवारी नाकारल्याने आंबेडकरी जनता नाराज झाली होती.आता २०२४ ला देखील जाहीर आश्वासन देऊन पप्पू कागदे यांना उमेदवारी न दिल्याने आंबेडकरी जनता रोष व्यक्त करत असून महायुतीचां प्रचार करणार नाहीत, महायुतीच्या उमेदवारांना मतदान करणार नाहीत. आंबेडकरी जनतेतून प्रतिक्रिया येत आहेत.बीड मधील मेळाव्यात,सभेत यांनी मंत्री,नामदार रामदास आठवले यांनी बीड मधील उमेदवारी जाहिर केली होती. केज मतदान संघात पप्पुजी कागदे साहेब यांना जाणीवपूर्वक महायुतीच्या लोकांनी डावलेले आहे, महायुतीला फक्त रिपाई चे मदत हवी आहेत का? मतदानापुरताच तुम्ही तरी समाजाचा वापर करून घेणार



- पप्पू कागदे यांना डावलने महागात पडणार.
- महायुतीला रिपाई कडून फक्त मतच हवे आहेत का?
- येत्या सर्वच निवडणुकीत रिपाई महायुतीच्या उमेदवाराला मतदान करणार नाही.

आहात का? आजच्या भीमसैनिकाला आठवली गटाच्या एका नेत्याला आमदार करायचं नाही का?असे महायुतीतील नेत्यांनी ठरवले आहे का?अश्या दलीत समाजात शब्दात महायुतीबदल तीव्र प्रतिक्रिया येत आहेत.बीड जिल्ह्यात ठझखच चे सर्व कार्यकर्ते नाराज झालेले आहेत त्यामुळे बीड जिल्हात महायुतीचे उमेदवार असतील तिथे ठझख महायुतीचे कोणतेही काम करणार नाही महायुतीच्या विरोधात सर्व कार्यकर्ते काम करणार आहे येणाऱ्या विधानसभा निवडणुक सह सर्वच निवडणुकीत काळात ठझख ची ताकद दाखवुन दिल्याशिवाय राहणार नाहीत असे ठझख महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मयाताई मिसळे यांनी म्हणले आहे.

### बिंदुसरेतील कालिंदेश्वर मंदिर बिल्डरांच्या पाशातून मुक्त

# सामाजिक कार्यकर्त्यांचा कालिंदेश्वराच्या चरणी अभिषेक:- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी । बीड**




बीड शहरातील फुलाई नगर मोंढा परीसरातील बिंदुसरा नदीपात्रातील पुरातण कालिंदेश्वर मंदिर बिल्डरांच्या तावडीतून मुक्त व्हावे यासाठी २ वर्षांपासून सुरू केलेला लढा अखेर यशस्वी होऊन सदर गट नंबर १९३ मधिल ४६ गुंठे जमीन भोगवटदार वर्ग २ मधुन वर्ग १ मध्ये करण्याचा तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भुसुधार) प्रकाश आघाव यांचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेतलेली नाही, तहसीलदारांचा अहवाल न घेताच आधिकाराचा गैरवापर झाला सदर इनाम जमिन सक्षम प्राधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय वाटणी प्रबंध असताना जमिनीचे वाटपपत्र केल्यामुळे या प्रकरणात शर्थभंग झाल्याचे दिसून येत असल्याचे नमूद करत जुना आदेश विद्यमान उपजिल्हाधिकारी ( सामान्य) शैलेश सुर्यवंशी यांनी रद्द करण्यात येत असल्याचे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील शासकीय अभियोक्त्यांना कळवले आहे. त्यामुळे अखेर कालिंदेश्वर मंदिर बिल्डरांच्या पाशातून मुक्त झाले असुन यानिमित्ताने आज दि.२१ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार यांनी कालिंदेश्वर मंदिरात विधिवत अभिषेक करून ईश्वर चरणी लिन होत आनंद व्यक्त केला.



## रिपाई एकतावादीची महत्वपूर्ण बैठक - शैलेंद्र पोटभरे

**प्रतिनिधी । बीड**

आगामी होत असलेल्या विधानसभा निवडणूक संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी ची अंबाजोगाई कृष्णा हॉटेल येथे दिनांक २२ रोजी मंगळवार दुपारी १:३० वाजता ठेवण्यात आली असून तालुकाप्रमुख सर्कल प्रमुख महिला आघाडी पदाधिकारी यांनी बैठकीत उपस्थित राहावे असे रिपाई एकतावादीचे बीड जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांनी एका पत्रकाद्वारे कळवले आहे.

## संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटलांनी अँड.स्वप्नील भैय्या गलधर यांना बीड विधानसभेची उमेदवारी जाहीर करावी: अक्षय नाईकवाडे

**प्रतिनिधी । बीड**



भारतीय जनता पार्टीची सत्ता असताना तालुकाध्यक्ष पद असतानाही मराठा आरक्षणासाठी व मराठा समाजाच्या आत्महत्या होत असल्यामुळे या पदाला व सत्तेला फक्त मराठा आरक्षणासाठी लाथ मारून राम राम ठोकणारा बीड जिल्यातील एकमेव मराठा सेवक व युवक नेतृत्व

अँड.स्वप्नील भैय्या गलधर हे होते यांनी गेल्या अनेक वर्षापासून मराठा आरक्षण चळवळीमध्ये व मराठा समाजाच्या विविध आंदोलनामध्ये सहभागी असताना बीड वासिया यांनी पाहिले आहे मराठा आरक्षणासाठी भारतीय जनता पार्टीमध्ये राहून न्याय मिळत नसल्यामुळे एक वर्षापासून जरांगे पाटलांबरोबर प्रत्येक आंदोलनामध्ये सहभागी होऊन स्वता सर्व जिम्मेदारी घेऊन व समाजासाठी अनेकांना अंगावरही घेतला आहे अशा या युवकाला जरांगे पाटलांनी उमेदवारी देऊन तरुण नेतृत्वाला बीड विधानसभा मध्ये नेतृत्व करण्याची संधी द्यावी अशी मागणी सर्व सामान्य जनतेची इच्छा आहे. व स्व. अमोल भैय्या गलधर युवा मंच च्या सर्व सदस्यांनी केली आहे अँड.स्वप्निल भैय्या गलधर यांचे मोठे बंधू कै.अमोल भैय्या गलधर यांनी मराठा महासंघामध्ये अनेक वर्षे मराठा आरक्षणाच्या लढ्यामध्ये काम केलेलं होते व बीड रेल्वे साठी महाराष्ट्र मध्ये असे कोणी आंदोलन केले नाही असे सर्वात प्रथम टॉवर वर चढून व रेल्वे साठी जेल मध्ये जाणार एकमेव ढाण्या वाघ होता त्यामुळे स्व. अमोल भैय्या गलधर यांना आदरांजली म्हणून बीड मतदारसंघांमध्ये जरांगे पाटलांनी अँड.स्वप्नील भैय्या गलधर सारख्या तरुण तडफदार चेहऱ्याला आमदारकीची संधी दिली तर आमदार करण्यासाठी भैय्यांसोबत रात्रंदिवस मतदार संघामध्ये सहभागी होईल असे आव्हान अक्षय नाईकवाडे व स्व. अमोल भैय्या गलधर युवा मंच बीड जिल्हा यांच्या वतीने करण्यात येत आहे

## केज मधुन पप्पुजी कागदे यांना डावल्यामुळे बीड जिल्ह्यात रिपाई महायुवतीच्या विरोधात काम करणार - गणेश वाघमारे

**प्रतिनिधी । बीड**



बीड युवक रिपाई पेठ बीड अध्यक्ष गेल्या काही दिवसात पप्पुजी कागदे यांनी केज मतदान संघात उमेदवारीची मागणी केली होती व नेते नामदार रामदास आठवले यांनी बीड मधील सभेत ही उमेदवारी जाहिर केली होती व आज ज्या केज मतदान संघात पप्पुजी कागदे साहेब यांना मुदाम महायुतीच्या लोकांना डावलेले त्यामुळे दलीत समाजात शब्दात महायुतीबदल तीव्र प्रतिक्रिया आल्या आहेत बीड जिल्ह्यात ठझख चे सर्व कार्यकर्ते नाराज झालेले आहेत त्यामुळे बीड जिल्हात जिथे कुटे महायुतीचे उमेदवार असतील तिथे ठझख महायुतीचे कोणतेही काम करणार नाही महायुतीच्या विरोधात सर्व कार्यकर्ते काम करणार आहे येणार्या काळात ठझख ची ताकद दाखवुन दिल्याशिवाय राहणार नाहीत आसे ठझख चे पेठ बीड अध्यक्ष गणेश भैय्या वाघमारे यांनी म्हणले आहे

# दुचाकी चोराकडून पाच मोटारसायकल जप्त

**प्रतिनिधी । बीड**




मागच्या काही दिवसांपासून दुचाकी चोरीच्या घटना वाढलेल्या असताना स्थानिक गुन्हे शाखेने काही दिवसांपूर्वी मोठी कारवाई करत १६ मोटारसायकल जप्त केल्या होत्या. आता पुन्हा एकदा बीड शहरातील खासबागमधून एका दुचाकी चोराला शहर पोलिसांना ताब्यात घेत पाच चोरीच्या दुचाकी हस्तगत केल्या आहेत. पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांनी ही मोठी कारवाई केली.दिवाळी सण तोंडावर आला असून दुचाकी चोरांची टोळी जिल्ह्यात सक्रिय होत असतानाच पोलिसांनी मोठ्या कारवाई करण्यास सुरुवात केली. शेख रहीम शेख राजू असे आरोपीचे नाव असून तो बीडच्या खासबागमध्ये आला होता. याची माहिती शहर पोलिसांना मिळाल्यानंतर त्याला सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. यावेळी आरोपीने पोलिसांना पाच दुचाकी चोरल्याची कबुली दिली असून सदर दुचाकी पोलिसांचं ताब्यात दिल्या आहेत. ही कारवाई पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय बाबा राठोड, मनोज परजने, अशपाक सय्यद, श्री. वायभसे यांनी केली.

सासरवाडीत आला पोलिसांनी पाहुणचार केला शेख रहीम शेख राजू गेवराई तालुक्यातील उमापूरमधील रहिवाशी असल्याचे कळते. तो दुचाकी विक्रीसाठी बीड शहरातील खासबाग परिसरात असणाऱ्या सासरवाडीत आला होता. याची माहिती शहर पोलिसांना कळल्यानंतर त्याला सापळा रचून अटक करण्यात आली. सासरवाडीत आलेल्या जावयाला पोलिसांनी मात्र ठाण्यात आणून चांगलाच पाहुणचार केला होता.चार दुचाकींचा लागला शोध शहर पोलिसांनी केलेल्या कारवाईत पाच मोटारसायकल जप्त केल्या आहेत. यातील चार मोटारसायकलचा शोध लागला असून दोन मोटारसायकल शिवाजी नगर हद्दीतून तर दोन मोटारसायकल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेल्या होत्या. अन्य एक मोटारसायकल कोणाची आहे याचा तपास पोलीस करीत आहेत.

# गेवराईत वंचितचे ओबीसी कार्डच्या प्रियंका खेडकराची इंट्री

**प्रतिनिधी । गेवराई**

राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावरून घमासान सुरू आहे. तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीने बाजी मारत उमेदवार जाहीर करण्यात चांगलीच आघाडी' घेतली. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी १६ जणांची चौथी यादी घोषित केली. यात गेवराई मतदारसंघातून सरपंच असलेल्या प्रियंका शिवप्रसाद खेडकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर गेवराई मतसंघातील सत्तासमीकरणे पाहता वंचित बहुजन आघाडीने खेळलेले ओबीसी कार्ड इंटरनेट गेवराई मतदारसंघातील प्रमुख विरोधी उमेदवारांसाठी आता डोकेदुखीचा विषय राहणार आहे. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रासोबतच राजकारणात देखील खेडकर कुटुंबियाचा दबदबा पूर्वीपासून असल्याने या मतदारसंघातील लढती काटेदार ठरणार यात शंका नाही.

गेवराई विधानसभेसाठी मतदारांची संख्या साधारण साडेतीन लाखांच्या घरात आहे. यात १ लाख ८५ हजारांच्या पुढे पुरुष तर १ लाख ६६ हजारांच्या पुढे महिलांची संख्या आहे. विशेष म्हणजे गेवराई तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या चकलांबा गावात प्रियांका खेडकर यांनी निर्विविद सत्ता मिळविली होती. प्रियांका यांचे पती शिवप्रसाद खेडकर कार्यकारी अभियंता असून त्यांचा लोकसंग्रह देखील मोठा आहे. याशिवाय त्यांचे वडील भगवानराव खेडकर १० वर्ष जिल्हापरिषद सदस्य होते. मुंडे कुटुंबियांशी त्यांचे ऋणानुबंध तसे अत्यंत जवळचे. गावाच्या



राजकारणात खेडकर दाम्पत्याचा पूर्वीपासूनच तसा दबदबा राहिला आहे. त्यात चकलांबासारख्या मोठ्या ग्रामपंचायला टोकाचा विरोध असताना एकहाती सत्ता मिळविण्यात त्यांना यश आले होते. ओबीसींचे प्रश्नांवर जागर, त्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरणे, राजकारणात महिला उमेदवार म्हणून स्वतःची छापा पाडण्यात प्रियांका यांना चांगले यश आले. गेवराई विधानसभेत मराठा समाजाची संख्या सव्वा लाखांच्या घरात असल्याचे चित्र आहे. पण यात आ. लक्ष्मण पवार, बदामराव पंडित, विजयराजे पंडित हे सर्व संभाव्य उमेदवार देखील मराठा समाजाचे असल्याने ओबीसींचे प्राबल्य येथे महत्वाचे ठरणार. मुस्लिम समाज ४१ हजार तर दलित समाज ३५ हजारांच्या घरात असून १ लाखांच्या आसपास ओबींसीची या मतदारसंघात ताकद असल्याचे कळते. त्यात प्रियांका खेडकर यांच्या रूपाने गेवराई मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी दिल्याने दलित मतदान देखील त्यांच्याकडे बऱ्यापैकी वळले जाणार. त्यामुळे गेवराई मतदारसंघात आजघडीला जरी कोण कुठून उभे रहाणार हे निश्चित नसले तरी प्रकाश आंबेडकर यांनी खेळलेले ओबीसी कार्ड गेवराई मतदारसंघातील जनतेसाठी एक भक्कम पर्याय म्हणून पुढे येत आहे.

# काँग्रेस पक्षाला मतपत्रिकेवर येऊ द्या अन्यथा जिल्हात पक्ष गोठेल

**प्रतिनिधी । माजलगांव**




विधानसभा निवडणुकीच्या पार्शश्वभुमीवर भारतीय काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जिल्हातील काँग्रेस पक्ष जिवंत ठेवण्यासाठी पक्षश्रेष्ठिला भावनिक हाक दिली आहे. जिल्हायातील काँग्रेस पक्ष जिवंत राहण्यासाठी काँग्रेस पक्षश्रेष्टीने जिल्ह्यातील किमान तीन मतदार संघावर दावा केला होता, परंतु आघाडी धर्मात जुळून घेण्यासाठी किमान परळी आणि केज हे दोन मतदार संघ सोडून घ्यावेत असा आग्रह होता.परंतु आघाडी मध्ये काँग्रेस ला जिल्ह्यातील एकाही मतदार संघात काँग्रेस पक्षाला जागा मिळत नसेल तर, जिल्ह्यातील भारतीय काँग्रेस पक्ष मतपत्रिकेवर आलाच नाही तर पक्ष आणि पक्षाच्या संघटनेशी जुडलेला कार्यकर्ते जिवंत राहणार नाहीत, परिणामी जिल्ह्यातील पक्ष संघटना गोठेल याची दक्षता पक्ष श्रेष्ठीने घ्यावी अशी भावनिक हाक पक्षाचे अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठिकडे केले आहे.

तसेच सद्या काँग्रेस मधील डझन भर कार्यकर्त्यांनी पक्ष श्रेष्टीकडे आपल्याकडे असणाऱ्या पदाचा व पक्ष्याच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामे देण्याच्या हालचाली सुरु केल्या असून, केज किंवा परळी मतदार संघात काँग्रेस पक्षाला उमेदवारी मिळाली नाही तर जिल्हाभरतील काँग्रेस कार्यकर्ते सांगली पॅटर्न राबून काँग्रेस जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करतील याची नोंद पक्ष श्रेष्ठी व महाविकास आघाडी यांनी घ्यावी असा इशारा ही अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे इशारा दिला आहे. तसेच काँग्रेस पक्षाच्या जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपला स्वाभिमान आबादित ठेवण्यासाठी उमेदवारी अर्ज भरून उमेदवारी लढवण्याचं आव्हान करत, आपण स्वतः केज विधानसभा मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरून पक्षाच्या सन्मानासाठी उमेदवारी लढवणारच असा इशारा काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## आष्टी मतदार महायुती सरकारने भीमराव धोंडे यांना भाजप चे तिकीट द्यावे -रमेश शिरसाट

# आष्टी मतदार संघात हमेशा वर्चस्व राहिलेल नेतृत्व...

**प्रतिनिधी । आष्टी**

हजारो गरीब शेतकऱ्याच्या मुलांना खेडोपाडी शिक्षण संस्था उभारून शिक्षण देणारा नेता... गावोगावी दुधडेअरी उभा करून योग्य भाव मिळून देऊन शेत कऱ्यांना जपणारा नेता... शांत संयमी अभ्यासू नेता, कधीही कोणाला त्रास नाही, कधी कोणाला अरेरावी नाही... अठरापगड जातीला सोबत घेऊन चालणारा नेता.. स्व.गोपीनाथ मुंडे प्रमाणे कधी जात पहिली नाही... जाती साठी माती खाणारे खूप पहिले पण... स्व. गोपीनाथ मुंडे म्हणायचे मी कुठल्या एका जातीचा नाही... ते विचार आत्मसात करत राजकरणार करणार नेतृत्व... आपल्या नेत्या पंकजाताई मुंडे यांचा कधीही शब्द न डावलणार नेतृत्व... काही लोक म्हणतात की... साहेबानी काय केल? तर त्याच्यासाठी... शेतकऱ्या साठी दिल्ली ला पायी जाणारे साहेब आहेत... शेतकऱ्यांच्या शेती मालाला योग्य भाव मिळून देण्यासाठी सतत पर्यन्त शील.शिक्षनाच्या माध्यमातून अनेक हिरे घडवाणारा नेता... विकासमय नेतृत्व.. रस्ते विकास कामाना भर... पैठण पंढरपूर महामार्ग धोंडे च्या काळात पूर्णतःवास.. स्व. गोपीनाथ मुंडे साहेब यांनी.. पहिला भगवान सेनेचा मोर्चा काढला तेव्हा त्या काळात मदतीचा हात पुरवणारा.. नेता दिलदार धोंडे साहेब...भाजप प्रवेशा पासून कधीही पक्षाला दगाफटका केला नाही ,पक्षाने या आधी टिकिट दिल नाही दिल कधी महायुती च्या नेत्याला पडण्याच कामं देखील केले नाही...उलट २०१९ ला साहेबांना दगाफटका पक्षातील च काही नेत्यां कडून झाला...प्रामाणिक पणे कामं करूनही भाजपने यांच्या एकही कार्यकर्त्यांना कामं दिले नाही..ते पक्षासाठी झटले नाहीत का त्यांचं पक्षासाठी योगदान नाही का..?काही पक्षश्रेष्ठी नी मतदार संघातील काही नेत्यांची शिफारस लावून धरलिये, त्यांना सांगणं आहे भिमराव धोंडे ही आपल्याच पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत त्यांना ही न्याय मिळायला हवा त्यांना टिकिट मिळायला हवं... ही आमच्या सारख्या कार्यकर्त्यांची माफक अपेक्षा आहे..जर तिकीट नाही मिळाल तर आमचा नेता या वेळी कार्यकर्त्याच्या आग्रहासत्व अपक्ष फॉर्म भरेल आणि निवडून ही येइल...

- रमेश शिरसाट

# संगतीने प्रवृत्ती बदलते.....स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज

## सेलूत श्रीराम कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । सेलू**

रामायणातील कैकेयीमाता यांचे श्रीरामावरती अत्यंत प्रेम होते. एवढेच नव्हे तर भगवान श्रीराम व भरत या दोघांनाही समान मानत असत, मात्र दुष्ट प्रवृत्तीच्या दासी मंथरे मुळे त्यांची वृत्ती बदलली .म्हणून संगतीचा दोष असतो. संगतीने चांगल्या माणसाची प्रवृत्ती बदलते ,असे प्रतिपादन आशीर्वचन पर बोलताना स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी शनिवार १९ ऑक्टोबर रोजी केले आहे ते म्हणाले की ,हलक्या माणसांच्या सोबत चांगली माणसे राहिली तर ते किती बिघडू शकतात ते बघा. त्यामुळे श्रीराम कधीच हलक्या व दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांत बसत नव्हते. दुष्ट लोकांच्या नादी लागलेली माणसं किती बिघडतात याच उदाहरण म्हणजे ,कैकेयीमाता ,हे होत. त्यामुळे प्रत्येकांनी महान विचारांच्या व चांगल्या विचारांच्या लोकांची संगत ठेवावी. रामाला भरता इतकेच महत्त्व देणाऱ्या कैकेयीमातेने रामाचा राज्याभिषेक सोहळा नाकारून ,त्याजागी भरताचा राज्याभिषेक सोहळा आणि रामाला १४ वर्षाचा वनवास हे दोन वर महाराज दशरथ यांच्याकडून घेतले. आणि रामाला १४ वर्षासाठी दंडक अरण्यात वनवासाला पाठवण्याचे काम कैकेयीमाते घडले. त्यामुळे संगत ही गोष्ट सर्वात महत्त्वाची आहे.

तसेच घरातील मांगल्य टिकून राहण्यासाठी गृहिणींनी सायंकाळी घराबाहेर पडू नये, घरामध्ये दिवे लावावेत. वेशभूषा भारतीय असावी. कपडे, खाणे पिणे, बोलण्याची मर्यादा यामुळेच घरातील मुलांवर देखील चांगले संस्कार होतात. प्राचीन गृह व्यवस्थेमध्ये वाटेल तेथे रडणे नसायचे



,यासाठी कोप भवन असायचे. केवळ वादविवाद ,भांडण व रडण्यासाठी प्रत्येक घरामध्ये कोपभवन नावाची व्यवस्था उपलब्ध असायची. ज्यांना रडायचे आहे त्यांनी, तेथे जाऊन रडावे .कारण घरात वास्तू देवता कायम वास्तव्यास असते .ती आपण जे बोलतो तसेच व्हावे म्हणते. म्हणून घरामध्ये कायम मंगल बोलावे. मंगल्याचा विचार बोलल्या गेला तर मंगलच होतं. त्या उलट वाईट बोलले गेले की, वाईटच होते .घरात दररोज चांगले बोलत गेल्यास घराचे उत्थान झाल्याशिवाय राहणार नाही .कारण शब्दांमध्ये व विचारांमध्ये सामर्थ्य आहे .असे स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी आशीर्वाचनपर बोलताना स्पष्ट केले

चांगल्या विचारांची व खानदानी घराण्यातील मुले नौकरांना देखील आदराने वागवतात .माणसांचा विवेक कायम जागृत असला पाहिजे. रघुकुलातील सर्वच माणसं कलंकाला भिणारी होती. आज आपण पाहत आहोत अख्या डांबराने न्हाऊन निघालो तरी, भीत नाहीत.म्हणजेच कलंकाला न भिणाऱ्या युगात आपण जगत आहोत. आपल्या मुलांना महानतेची प्रेरणा देणाऱ्या माता या वीरमाता असतात .माझ्या मुलांनी देशासाठी काहीतरी केले पाहिजे ,अशा माता जन्माला येणे गरजेचे आहेत. अशा माता जन्माला आल्या तर भारताला सुवर्णकाळ येईल. प्रत्येकाने तीर्थांच्या मर्यादा राखायला शिकलं पाहिजे. हा शिष्टाचार सदाचार आहे. संस्कृतीचे महत्त्व कळले पाहिजे.दिवसातून देवाला एकदा तरी दंडवत करणे गरजेचे आहे. मोठ्यांनी घरातील छोट्यांना वारंवार चांगल्या गोष्टी सांगत राहणे गरजेचे आहे. कपडे हे अंग झाकण्यासाठी असतात, त्यामुळे महिलांनी शीलवान महिलांचे लक्षण जपली पाहिजेत .आपले वेद जगले पाहिजेत. आपल्या मुलांना प्राचीन इतिहास व आपल्या पूर्वजांचा इतिहास सांगितला तर प्रत्येक घरात मांगल्य नांदू शकते .असेही स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी आशिर्वचनपर बोलताना स्पष्ट केले. द्वारकाधीश यांची म्हणजेच मथुरेची प्रतिकृती व्यासपीठावर सादर करून ही भागवत कथा मथुरेत सुरू असल्याची अनुभूती भाविकांना आली.संयोजकाच्या वतीने देशाचे संरक्षण करणाऱ्या मुलांच्या पालकांचा तसेच वृक्ष संवर्धन करणारे यांचा स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# राष्ट्रीय मजदुर कांग्रेस ( इंटक ) ची परळी तालुका कार्यकारिणी लवकरच जाहीर होणार – रामधन जमाले

**प्रतिनिधी । परळी**

राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक ची परळी तालुका कार्यकारिणी ची नव्याने पुनर्रचना करण्यात येणार असून राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.जी.संजिवा रेड्डी आणि महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली असंघटित आणि संघटीत क्षेत्रातील कामगार चळवळ भक्कम आणि मजबूत करण्यासाठी तसेच कामगाराचे जीवन मान उंचावून त्यांना स्वाभिमानाने जीवन जगण्याचसाठी बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक ची नव्याने पुनर्रचना करण्यात येणार आहेत तरी इच्छुक उमेदवारांनी लहुदास रोडे (९३७३०८२७४७) यांच्या शी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अध्यक्ष रामधन जमाले यांच्या वतीने करण्यात येत आहे आहे.

दरम्यान येत्या काळात असंघटित आणि संघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक डॉ जी संजिवा रेड्डी आणि डॉ कैलास भाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली मोठी चळवळ उभी करणार असून बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील राष्ट्रीय मजदुर कांग्रेस इंटक ची नव्याने पुनर्रचना करण्यात येणार आहे म्हणून ज्यांना या कामगार चळवळीत काम करायचे आहे.अशा उमेदवाराने जिल्हा अध्यक्ष रामधन जमाले आणि लहुदास रोडे ९३७३०८२७४७ यांच्या संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अध्यक्ष रामधन जमाले यांच्या वतीने करण्यात येत आहे असे एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवण्यात आले आहे.

# सांगवी पाटण येथे हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

**प्रतिनिधी । आष्टी**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे ५४ वा अखंड हरिनाम सप्ताह ह. भ. प. सुदर्शन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व ह. भ. प. काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली दसऱ्याच्या मुहूर्तावर प्रारंभ झाला होता. काल ढोल, ताशा, हलगी पथक, लेझिम, जेसीपी ने फुलांची उधळण करण्यात आली. ना भुतो, ना भविष्यतीत सप्ताह सोहळ्याची उत्साहात सांगता झाली.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून, या भूमीला खर्या अर्थाने संत परंपरेच अनुष्ठान लाभलं आहे. म्हणून संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा लाभला आहे. याच जोरावर हा वारकरी संप्रदाय आजही टिकून आहे. म्हणूनच भगवंताच्या कृपेने साधुसंताचा आशीर्वादाने गावकऱ्यांनी महंत ह. भ. प. सुदर्शन महाराज व भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री याची रथावर भव्य दिव्य मिरवणूक काढली.

काल्याचे किर्तन ह. भ. प. काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगत होत महाप्रसादाचा ग्रामस्थांनी आस्वाद घेत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या अध्यात्मिक, परमार्थिक ज्ञानयज्ञ सोहळ्यात गेली सात दिवस महाराष्ट्रातील अनेक नामवंत कीर्तनकारांची किर्तन झाली, तसेच सातव्या दिवशी सायंकाळी दिपवंदन होतं, काल्याच्या दिवशी दिंडी प्रदक्षिणा झाली तसेच सात दिवस विशेष योगदान देणाऱ्या, सर्व गायक – वादक, गावातील युवा महिला कीर्तनकार, सर्वगुणीजन मंडळींना महाराजाच्या हस्ते नारळ देण्यात आला व नतंर



परिसरातील शेकडो नागरिक, गावचे सरपंच दत्तात्रय खोटे, ग्रामस्थ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महाप्रसादाच्या कार्यक्रमाने सांगता झाली. यावेळी परिसरातील सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील, अनेक ज्येष्ठ प्रतिष्ठित मान्यवर व गावातील अनेक महिला भगिनी, पुरुष, तरुण बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांचे सांगवी पाटण ग्रामस्थांनी आभार मानले.

# भाजपच्या पहिल्या यादीत मराठवाड्यातून 17 उमेदवार रिंगणात

## मराठा उमेदवारांना सर्वाधिक संधी, नव्या समीकरणाची चर्चा!



मराठवाड्यातील 16 विधानसभा मतदारसंघातील उमेदवारी आज भाजपकडून जाहीर करण्यात आली आहे. तर एक ठिकाणी अजूनही उमेदवार जाहीर करण्यात आलेले नाही. गेल्यावेळी भाजपने मराठवाड्यात 16 उमेदवार रिंगणात उतरवले होते. मात्र यंदा भोकरमधून अशोक चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आल्याने एकूण 17 ठिकाणी भाजप मराठवाड्यात उमेदवार देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. ज्यात बीड जिल्ह्यातील गेवराई येथील उमेदवार अद्यापही जाहीर करण्यात आलेले नाही, गेल्यावेळी येथून लक्ष्मण पवार यांना उमेदवारी देण्यात आली होती. तर दुसरीकडे संभाजीनगर मधील फुलंब्री विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपाल पदी नियुक्ती झाल्याने या ठिकाणी भाजपकडून अनुराधा चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे.दरम्यान, भाजपच्या पहिल्या यादीमध्ये सख्ख्या भावांना तिकीट देण्यात आलं आहे. तीन अपक्षांना उमेदवारी देण्यात आली असून नेत्यांची मुलंही मैदानात आहेत. घराणेशाहीवर सातत्याने बोललं जात असताना मुंबईचे भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांच्या भावाला मालाड पश्चिममधून उमेदवारी देण्यात आली आहे. वांद्रे पश्चिममधून आशिष शेलार यांना संधी देण्यात आली आहे. भोकरमधून भाजप खासदार अशोक चव्हाण यांच्या कन्या श्रीजया चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

फुलंब्री विधानसभा -हरिभाऊ बागडे राज्यपाल झाल्याने अनुराधा चव्हाण यांना उमेदवारी , छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभा अतुल सावे, गंगापूर विधानसभा-प्रशांत बंब, किनवट, विधानसभा भीमराव केराम, नायगाव विधानसभा-राजेश पवार, मुखेड विधानसभा-तुषार राठोड, हिंगोली विधानसभा- तानाजी मुटकुळे, जिंतूर विधानसभा-मेघना बोर्डीकर, परतूर विधानसभा-बबन लोणीकर, बदनापूर विधानसभा-नारायण कुचे, भोकरदन विधानसभा-संतोष दानवे, गेवराई विधानसभा-वेटिंग, केज विधानसभा-नमिता मुंदडा, निलंगा विधानसभा संभाजी पाटील निलंगेकर, औसा विधानसभा-अभिमन्यू पवार, तुळजापूर विधानसभा-राणा जगजितसिंह पाटील, भोकर विधानसभा-श्रीजया चव्हाण

- दरम्यान, विदर्भामधून सर्वाधिक कुणबी उमेदवार देण्यात आले आहेत, तर पश्चिम महाराष्ट्रात विदर्भामध्ये विद्यमान आमदारांना सर्वाधिक संधी देण्यात आली आहे. सर्वाधिक संवेदनशील झालेल्या मराठवाड्यामध्ये मराठा उमेदवार सर्वात जास्त देत मनोज जारंगे पाटील यांचा फॅक्टर कमी कसा करता येईल याकडे सुद्धा लक्ष देण्यात आलं आहे. भाजपच्या पहिल्या यादीमध्ये तीन अपक्षांना सुद्धा संधी देण्यात आली आहे. यामध्ये महेश बालदी यांचा सुद्धा समावेश आहे, तर अन्य दोन अपेक्षांना सुद्धा संधी देण्यात आली आहे. यामध्ये राजेश बकाने यांना देवळी विधानसभा मतदारसंघातून संधी देण्यात आली आहे, तर विनोद अग्रवाल यांना गोंदिया मतदारसंघातून संधी देण्यात आली आहे. हे दोन्ही आमदार मागील वेळी अपक्ष म्हणून निवडून आले होते.

# प्रवाशांच्या सोयीसाठी परळी ते पुणे मार्गावर विशेष रेल्वे गाडी चालवा

## राजेभाऊ फड यांनी रेल्वे मंत्र्यांना पत्र लिहून केली मागणी

**प्रतिनिधी । परळी**

ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात सणासुदीचे दिवस असतात. पुण्या, मुंबईला गेलेले चाकरमानी दिवाळीच्या सुट्ट्यांत आपापल्या गावाकडे येतात आणि सुट्टी संपल्यानंतर परत तिकडे जातात. पुणे ते परळी रेल्वेने प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रवाशांची गैरसोय टळावी आणि त्यांना उत्तम व सुरक्षित सोय व्हावी यासाठी पुणे ते परळी रेल्वे मार्गावर विशेष रेल्वे गाडी सुरू करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पत्र लिहून विनंती केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी केंद्रीय रेल्वे मत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, आगामी दिवाळीच्या हंगामात पुणे ते परळी वैजनाथ मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे, अनेक प्रवाशांना आरक्षण मिळणे कठीण होणार आहे. दिवाळी हा अत्यंत महत्त्वाचा सण असल्यामुळे अनेक प्रवासी आपल्या कुटुंबियांसोबत प्रवास करतात. आपल्याला विनंती आहे की, दिवाळीच्या हंगामाच्या (ऑक्टोबर-नोव्हेंबर) कालावधीत पुणे ते परळी वैजनाथ या मार्गावर एक विशेष रेल्वे गाडी चालविण्याचा विचार करावा. यामुळे प्रवाशांना आरामदायक व सुरक्षित प्रवासाची संधी मिळेल व सणासुदीच्या काळात त्यांच्या अडचणी कमी होतील. अशा आशयाची मागणी करून यावर तातडीने निर्णय घ्यावा अशी विनंती राजेभाऊ फड यांनी केली आहे.

# सुनील गुट्टेंना परळी विधानसभेच्या उमेदवारीचे वरिष्ठांकडुन संकेत!

## शेतकरी संवाद यात्रे निमित्ताने घेतलेला आढाव पक्ष श्रेष्ठीकडे सुपूर्त

**प्रतिनिधी । मुंबई**

सध्या राज्यात विधान सभेच्या उमेदवारी बाबत अनेक उमेदवारांची आप आपल्या पक्ष श्रेष्ठीकडे उमेदवारी मिळवण्यासाठी भेटी घेतल्या जात आहेत त्यातच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडेही परळी विधानसभा मतदारसंघात आपल्यालाच उमेदवारी मिळावी या करिता आप आपल्या परीने इच्छुक उमेदवार भेटी घेत असताना पक्षाच्या कोअर कमिटीने युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांना तातडीने मुंबई येथे बोलावून पक्ष श्रेष्ठीकडुन उमेदवारीचे संकेत दिल्याचे कळते आहे.युवा नेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी आज रविवारी सकाळी



मुंबई येथील.....येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब, राज्य अध्यक्ष जयंत पाटिल, खा.सुप्रिया सुळे, आ.रोहित दादा पवार यांची भेट घेऊन परळी विधानसभा मतदार संघाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चा दरम्यान परळी मतदारसंघात काढलेल्या शेतकरी संवाद यात्रेचा अहवाल, नौकरी महोत्सव अदी कार्याचा कार्य अहवाल पक्ष श्रेष्ठींना देऊन मतदार संघाची सद्य परिस्थिती वर सखोल चर्चा करण्यात आली. पक्ष श्रेष्ठींकडून शेतकरी संवाद यात्रा नौकरी महोत्सवाची दखल घेऊन कौतुक केले असून अजून ही पुढे आशाच कार्याची अपेक्षा पक्ष श्रेष्ठीकडुन युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ. सुदामतीताई गुट्टे या माता व पुत्राला सुचक विधान करुन उमेदवारी चे संकेत दिले असल्याचे बोलले जात आहे. याच बैठकीत यावेळी परळी मतदारसंघात सुरू केलेल्या शेतकरी संवाद यात्रेबद्दल साहेबांना माहिती दिली. तसेच मतदारसंघात आयोजित रोजगार मेळावे, ज्यातून हजारो तरुणांना पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर येथे रोजगार मिळाला, याबद्दलही चर्चा झाली. आतापर्यंत केलेल्या कामांचा कार्य अहवाल शरद पवार साहेबाना सादर केला. तसेच परळी मतदार संघात विधानसभेसाठी इच्छुक असल्याचा माता पुत्राकडुन उमेदवारी आम्हालाच मिळावी अशी मागणी करताच तुम्ही परत मतदारसंघात जाऊन जोमाने कामाला लागा अश्या सुचना पक्ष श्रेष्ठींनी दिल्या आसल्याने सुनील गुट्टेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार असतील या तातडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरदचंद्रजी पवार साहेब, राज्य अध्यक्ष जयंत पाटिल, खा. सुप्रिया सुळे, आ. रोहित दादा पवार यांची भेट युवानेते सुनील गुट्टे व जेष्ठ नेत्या सौ. सुदामतीताई गुट्टे यांनी भेटी घेतल्याने राजकीय चर्चांना बळ मिळत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.BEED DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT